संस्थापक - नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

नवा काळ

रोखठोक बेधडक

संपादकीय.....

॥ न मे भक्त : प्रणश्यति ॥

# भेटवस्तूंच्या नावाखाली सरकारी लाचखोरी

दीपावली आणि शुभेच्छा हे समीकरण एवढे पक्के आहे की, या शुभेच्छा देण्यासाठी कोणकोणते नवनवीन मार्ग शोधले जातील हे काही सांगता येत नाही. या शुभेच्छा खरेतर आपल्या मनातील भावना व्यक्त करण्याची एक पद्धत आहे. नातेवाईक, आप्तेष्ट किंवा आपल्या परिचयातील मंडळींना शुभेच्छा दिल्या जातात. त्यासाठी सुंदर सुबक आकर्षक अशा शुभेच्छापत्रांपासून अलीकडच्या काळात एसएमएस पाठवीण्यापर्यंत वेगवेगळ्या माध्यमांचा उपयोग केला जातो. खरेतर शुभेच्छा हा प्रकार किंवा त्यामागची भावना ही निरपेक्ष निर्वाज मनाची साक्ष असायला हवी. पण अलीकडच्या काळात तसेच निरपेक्ष प्रेम किंवा स्नेहदेखील शिल्लक राहिलेला नाही. उलट गेल्या काही वर्षांत दिवाळीच्या शुभेच्छांच्या नावाखाली विशेषतः किंवा प्रामुख्याने सरकारी कार्यालयात मोठमोठ्या किमतीच्या मौल्यवान वस्तू भेट देण्याचा प्रकार फोफावला आहे. शुभेच्छा आणि भेटवस्तू असे मिश्रण दिवाळीचे निमित्त साधून वेगवेळ्या सरकारी आणि खासगी कंपनीच्या बड्या पदावरच्या अधिकाऱ्यांकडे पोहोचवले जाते. आता तर साधारण कर्मचारीसुद्धा या कार्यालयात छोट्यामोठ्या कामासाठी येणाऱ्यांकडून भेटवस्तू मिळावी अशी अपेक्षा ठेवतो. जणूकाही दिवाळीतली भेटवस्तू हा त्याचा अलिखित हक्कच ठरू लागला आहे. सरकारी कार्यालय मग ते कोणतेही असो. अगदी पंचायत समिती, जिल्हाधिकारी कार्यालय किंवा थेट मंत्रालय या सर्व ठिकाणी दिवाळीच्या निमित्ताने भेटवस्तूंचे जे ढीग लागतात ते पाहिल्यावर भेटवस्तू देण्यामागे कोणताही प्रामाणिक हेतू नाही हे सिद्ध होते. उलट कामे करून घेण्याचा एक छोटा मोबादला म्हणून भेटवस्तू देण्याचा व्यापार किंवा व्यवहार सुरू झाला आहे. आता हे लोण खासगी किंवा मोठमोठ्या कॉर्पोरेट ऑफिसेसमध्ये बोकाळले आहे. बड्या अधिकाऱ्यांना महागड्या वस्तूंच्या भेटी दिल्या जातात. तर साधारण कर्मचाऱ्यांना एखाद्या मिठाईचा बॉक्स देऊन समाधानी केले जाते. परंतु केंद्र सरकार असो किंवा राज्य सरकार असो. याठिकाणी बड्या अधिकाऱ्यांना भरभक्कम किमतीच्या भेटवस्तू दिल्या जातात. त्यांना आपल्या कामासाठी सतत संपर्कात ठेवण्यासाठी किंवा आपली बेकायदेशीर कामे बिनबोभाटपणे मंजूर करून घेण्यासाठी हा भेटवस्तूंचा रतीब घातला जातो. भेटवस्तू यासुद्धा स्वेच्छेने दिल्या जाणे अपेक्षित आहे. मात्र अलीकडे त्यासाठी सरकारी कार्यालयातले आणि खासगी कंपनीतले मोठे अधिकारी दबावतंत्राचा वापर करू लागले आहेत.

## आपापली कामे करून घेण्यासाठी

खासगी आणि सरकारी कार्यालयातल्या सर्वच अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना दिवाळीत काही ना काही प्रमाणात बोनस मिळत असतो. परंतु त्यांचे या बोनसपेक्षाही भेटवस्तूंकडे सर्वाधिक लक्ष असते. एखाद्या वाढत्या रोगाप्रमाणे या भेटवस्तू नावाच्या आमिषाचे प्रमाण वाढत आहे. त्यामुळे खासगी कंपनीतल्या काही मंडळींनी आवाज उठवायला सुरुवात केली आहे. त्यांच्या म्हणण्याप्रमाणे या भेटवस्तू म्हणजे दिवाळीचे निमित्त साधून लाच देण्याचाच प्रकार घडतो. ही सरळसरळ छुपी लाचखोरी असते. ती केवळ शुभेच्छा देण्याची साधी-भोळी पद्धत नाही तर आपली कामे करून देणाऱ्यांना आमिष देऊन अंकीत करण्याचा तो प्रकार आहे. भेटवस्तूंचा हा तमाशा ताबडतोब बंद करावा किंवा त्यावर बंधणे आणावीत अशी मागणी आता कॉर्पोरेट कंपन्यांच्या कार्यालयातल्या उच्चशिक्षित आणि स्वाभिमान बाळगणाऱ्या वर्गाकडून सुरू झाली आहे. तशीच बंधने सरकारी कार्यालयात चालणाऱ्या लाचखोरीच्या भेटवस्तूंबाबत आणण्याची वेळ आली आहे. विशेषतः ज्या अधिकाऱ्यांकडे मोठमोठी कामे मंजूर करण्याचे अधिकार असतात, कामांची बिले तयार तयार करून त्या रकमा वितरित करण्याचे अधिकार असतात अशांना दिवाळीत खूष करण्याचा प्रयत्न होतो. त्यातून मंत्रालयातले मंत्रीही सुटलेले नाहीत. उलट सर्वात महागड्या वस्तू मंत्र्यांनाच या दिवाळीच्या निमित्ताने दिल्या जातात. आता अगदी अधिकृतपणे दिवाळीत राजरोसपणे चालणारी ही भेटवस्तूंची लाचखोरी थांबविण्याची वेळ आली आहे.

## प्रामाणिक भावनांच्या सदिच्छा

अनेक प्रगत देशांमध्ये अशा भेटवस्तू देणे म्हणजे लाच देण्याचाच प्रकार मानला जातो. त्याविरुद्ध अमेरिका, इंग्लंड या देशात कायदे केले गेले आहेत. सरकारी अधिकारी जी कामे करतात ती त्यांची जबाबदारी आणि कर्तव्ये असतात. परंतु नियमानुसार कामे न करणे आणि अशा बेकायदेशीर कामे करण्याचा मोबदला मागण्याचा प्रकार इतका वाढला आहे की त्याला काही सीमा राहिली नाही. एका खासगी सर्वेक्षणानुसार दीपावलीच्या निमित्ताने वेगवेगळ्या सरकारी कार्यालयामध्ये भेटवस्तू देण्याची जी उलाढाल होते त्याची रक्कम तब्बल आठ हजार कोटींपर्यंत असल्याचे दिसून आले आहे. म्हणजे ज्या गोष्टी सरकारी कार्यालयात उघडपणे देता येत नाहीत त्या दिवाळीच्या निमित्ताने घरापर्यंत सहज पोहोचवल्या जातात. आकर्षक वेष्टणातल्या खोक्यांमध्ये नेमके काय आहे हे फक्त देणाऱ्यालाच आणि ती वस्तू घेणाऱ्याला माहीत असते. मात्र या प्रकाराला गुजरातमध्ये नरेंद्र मोदी यांनीख बंदी घातली होती. ते मुख्यमंत्री असताना सरकारी कार्यालयातला कोणताही अधिकारी भेटवस्तू स्वीकारणार नाही, केवळ शुभेच्छापत्र स्वीकारेल असा दंडक त्यांनी घातला होता. एवढेच नव्हे तर प्रसारमाध्यमातल्या कोणालाही त्यांनी कधीही भेटवस्तू दिली नाही. आता हीच पद्धत त्यांनी आपल्या केंद्र सरकारी कार्यालयात लागू करावी. एवढेच नव्हे तर राज्य सरकारी कार्यालयात हा जो भेटवस्तू देण्याचा धंदा बोकाळला आहे त्यावरही उपाय शोधून काढावा. महाराष्ट्राच्या मंत्रालयात तर दिवाळी म्हणजे वर्षभराची वसुली करून घेण्याचा हंगाम असतो. सरकारी काय किंवा सहकारी काय या दोन्ही बँकांमध्ये मॅनेजरलोकांना इतक्या भेटवस्तू मिळतात, की या बँका म्हणजे त्याची खासगी पतपेढी आहे की काय असे वाटू लागते. आपापली प्रकरणे विनातक्रार लवकरात लवकी मार्गी लागवीत आणि वेळ अडचणीला हे अधिकारी उपयोगी पडावेत म्हणून या भेटवस्तूंचा दिवाळी फंडा वापरला जातो. परंतु एकूणच सामाजिक सभ्यतेत आणि सरकारी कामाच्या शिस्तीत न बसणारी ही पद्धत ताबडतोब बंद झाली पाहिजे. दिवाळीत भेटवस्तूंपेक्षा प्रामाणिक भावनांच्या सदिच्छाच भेट दिल्या पाहिजेत.